महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोग्योग मंडळ
( उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग)
• प्रशासन कार्यालय •

१९/२१ मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई -४०० ००१. दुरध्वनी कार्यालय: ०२२-२२६१७६४१-२-३. ई-मेल hokvib@mskvib.org

कार्यासन-३/प्रशासन/२०२५/ दिनांक:-२५/०२/२०२६

## - शुध्दीपत्रक -

> करार पध्दतीने द्यावयाच्या नियुक्ती या सर्वसाधारण खालील अटी व शर्तींच्या अधिन राहतील

१. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूका या ११ महिने कालावधीसाठी आहेत. ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात,

३. नियुक्त अर्जदाराला त्यांना नेमून दिलेल्या कामाच्या प्रमाणात मंडळ ठरवील ते तसेच शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे वेतन अनुज्ञेय राहील.

४. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा कोणताही लाभ मिळणेचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने ५००/- च्या स्टॅम्प वर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहील,

५. करार पध्दतीवर नियुक्त करण्यात येणा-या (व्यक्ती) अधिकारी किमान ११ महिने अथवा मंडळ ठरविल इतक्या कालावधीपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पदावर कार्यरत राहतील . त्यांच्या वयाच्या ६५ वर्षापेक्षा जास्त वय झाल्यावर नियुक्तीस पात्र असणार नाही.

६. अर्ज सादर करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत याबाबतचे रु. ५००/-स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिका-याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावे. याबाबत अर्जदारानी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील,

९. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्तीचे अधिकार राहतील.

१०. सदर सेवानिवृत्त अधिकारी त्यांचेवर सोपविलेल्या / पार पाडावयाच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा, अशा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकारी यांना प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. अशा करार पध्दतीवरील नियुक्ती अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१३. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

.२.

१४. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे, तसेच प्रशस्तीपत्र/नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१५. क्षेत्रीय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिका-यास सेवाकाळामध्ये नैसर्गिक अपघात वा काही आजार उदभवल्यास कोणत्याही परिस्थीतीस कार्यालय/शासन बांधील/जबाबदार राहणार नाही.

१६. करार पध्दतीनें नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१७. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ईमेल/पोस्टद्वारे पाठविण्यात येईल भ्रमणध्वनीवर लघुसंदेशद्वारे कळविण्यात येईल, यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत अचूक ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास पथ, भाटीया बालरक्षक विद्यालय, फोर्ट, मुंबई- ४००००१. यांचे सूचना फलकावर दिनांक ११/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल व अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना वैयक्तिक ईमेल/टपालाद्वारे कळविण्यात येईल.

१८. सदर नियुक्ती वर नमूद केलेल्या विवक्षीत कामासाठी केलेली असून, त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व/समिती ठरवेल तेवढे पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

१९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२०. उपरोक्त अटी व शर्ती व्यतीरीक्त शासन/नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

२१. कार्यालयाच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिका-यांच्या कामाच्या ठिकाणात बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

२२. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार जाहीरातीत नमूद केलेली पदे कमी/अधिक होऊ शकतात.

२३. सेवानिवृत्त अधिका-यास मंडळातील विवक्षीत कामाबाबत जसे, शहरी व ग्रामीण भागात रोजगार निर्मीती साठी मंडळामार्फत राबविण्यात येणा-या पंतप्रधान रोजगार निर्मीती योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मीती योजना, पंतप्रधान विश्वकर्मा योजना, मधकेंद्र योजना व मधाचे गाव योजना इ बाबत पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(गीतांजली बाविस्कर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.